वाचा :- १) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक .राभूअ-२०१३/प्र.क्र.३२/ल-१ महसूल व वन विभाग मंत्रालय,मुंबई-३२ दिनांक २३/०१/२०१३

२) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य)पुणे यांचेकडील परिपत्रक क्र.रा.भु.अ.आ.का.-४/प्र.क्र.१६ डेटा दुरूस्ती आज्ञावली /१३ पुणे दिनांक २०/०५/२०१३

३) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य)पुणे यांचेकडील परिपत्रक क्र.रा.भु.अ.आ.का.-४/डे.दु.आ./प्र.क्र.१७ /२०१४ पुणे दिनांक २४/०७/२०१४

---

**क्रं.रा.भु.अ.आ.का.-४/प्र.क.०१ /२०१५**
**जमाबंदी आयुक्त आणि संचालक**
**भूमि अभिलेख ( महाराष्ट्र राज्य ),पुणे**
**यांचे कार्यालय ,पुणे.**
**दिनांक - ०३ /०२ /२०१५**

# परिपत्रक

**विषय :- डाटा दुरुस्ती आज्ञावली मधील अहवाल क्रमांक १,३,६,८ व ९ निरंक करणेबाबत.**

१. ई-फेरफार प्रकल्प राबविणेच्या प्रक्रीयेत राज्यामध्ये चांगला वेग आला असून २२० तालुक्यामध्ये ट्रायल रन सुरु असून १७ तालुक्यामध्ये ऑनलाईन फेरफार प्रक्रीया सुरू झाली आहे.

२. सदर प्रकल्प राबविण्याताना अहवाल क्रमांक १ ते १४ पुर्णत: निरंक करणे आवश्यक आहे. परंतु: अहवाल क्रं. १ व ३ निरंक करण्यासाठी काही वेळेस महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ कलम १५५ नुसार विहीत केलेली प्रक्रीया पार पाडावी लागते. ती प्रक्रिया अर्धन्यायीक कार्यवाही असलेने त्यासाठी वेळ लागतो. मात्र इतर अहवाल निरंक करण्यासाठी तशी कार्यवाही करण्याची आवश्यकता नसते. ई-फेरफार प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे काम वेगाने व्हावे म्हणुन काही अहवाल ट्रायल रन पुर्वी निरंक करावेत आणि उर्वरीत अहवाल ट्रायल रन नंतर निरंक करावेत तशी व्यवस्था करणेत आली आहे. तशा सुचना या कार्यालयाकडील क्र.रा.भु.अ.आ.का.-४/प्र.क्र.१६ डेटा दुरूस्ती आज्ञावली /१३ पुणे दिनांक २०/०५/२०१३ परिपत्रकातून देण्यात आलेल्या आहेत. ट्रायल रनसाठी डाटा सीडी प्राप्त झाल्यानंतर काही अहवालामध्ये काही प्रमाणात त्रुटी असल्यातरी ट्रायल रन हा सरावासाठी असलेने ट्रायल रनला विलंब होऊ नये म्हणुन सीडी स्टेट डेटा सेंटरच्या सर्व्हरवर अपलोड केली जाते. तथापी ट्रायलरन कालावधीत मात्र सर्व त्रुटी दूर करुन अहवाल क्र.१ व ३ व्यतिरिक्त उर्वरीत सर्व अहवाल निरंक

करणे आवश्यक आहे.

ट्रायल रन कालावधीत प्रलंबीत अहवाल क्र. १ ते १४ निरंक न करताच ऑनलाईनलो जाण्यासाठी सीडी सादर केल्या जात असल्याचे निदर्शनास आले आहे. अंतीमत: ऑनलाईनला जाण्यापुर्वी तालुक्यातील अहवाल क्र. १ व ३ मध्ये त्रुटी निवारणार्थ शिल्लक राहिलेल्या गट नंबर/सर्व्हे नंबर मध्ये ई-फेरफारचा अंमल होणार नाही, अशी व्यवस्था करुन संबंधीत स.न./ग.न. आज्ञावलीतून फेरफार घेण्यासाठी प्रतिबंधीत (Block) करणेची व्यवस्था करणेत आली आहे.

३. वरील वस्तुस्थिती पाहता अहवाल निरंक करणेबाबत खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

अंतीमत: ऑनलाईनसाठी सीडी पाठविताना **अहवाल क्र.१ व ३ शिवाय उर्वरीत सर्व अहवाल निरंक करणे आवश्यक आहे**. या सुचनेची दखल घेऊन अंतीमत: ऑनलाईनला जाण्यासाठी सीडी सादर करावी.

४. **अहवाल क्र. ६ बाबत खुलासा व प्रमाणपत्र**

अहवाल क्र. ६ बाबत खुलासा करण्यात येत आहे की, वैयक्तिक कब्जेदाराच्या नावा शिवाय (पहिलेनाव, मधलेनाव, आडनाव व असल्यास टोपननाव ) इतर कब्जेदार जसे सरकार, मसनवाटा, मंदीर, गायरान संस्था , ट्रस्ट, कंपनी इत्यादी प्रकराच्या ७/१२ वरील नावामुळे अहवाल निरंक होऊ शकत नाही. कारण यामध्ये ३ नावे असतील असे नाही. अशा प्रकारच्या त्रुटी निरंक करणेवर शिल्लक असल्यास तहसिलदार यांनी खालीलप्रमाणे प्रमाणपत्र सादर करावे.

## प्रमाणपत्र

प्रमाणित करणेत येते की, अहवाल क्र. ६ मधील वैयक्तिक नावाने असणा-या सर्व दुरुस्त्या / त्रुटी दुरुस्त करण्यात आल्या आहेत. शिल्लक राहीलेल्या त्रुटी या सरकार, मसनवाटा, मंदीर, गायरान संस्था , ट्रस्ट, कंपनी इत्यादी बाबतीत आहेत. या त्रुटींच्या तफावतीसह अहवाल स्विकारण्यात यावा.

**स्थळ :-**
**दिनांक :-**

**सही**
**तहसिलदार**

५. **अहवाल क्र. १४ बाबत खुलासा व प्रमाणपत्र**

अधिकार अभिलेख गाव नमुना नंबर ७ भरलेला आहे पण पिक पाहणीच्या नोंदी असलेला गाव नमुना नंबर १२ भरलेला नाही अशा त्रुटी आज्ञावलीतून अहवालामध्ये दिसुन येत आहेत. याबाबत डोमेन

एक्सपर्ट ग्रुपच्या बैठकीमध्ये चर्चा केली असता असे निदर्शनास आले आहे की, काही अधिकार अभिलेख (७/१२) संगणकीकरणानंतर (पोट हिस्सा, बिगर शेती, भुसंपादन) इत्यादी कारणामुळे उघडण्यात आलेले आहेत. सदर अधिकार अभिलेखामध्ये ते उघडण्यात आलेल्या दिनांकापासून पीक पाहणीच्या नोंदी घेण्यात येत असतात. त्यामुळे असे अधिकार अभिलेख (७/१२)उघडलेल्या दिनांकापुर्वीची पीक पाहणी नमुद करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. परंतु अशा त्रुटी अहवाल क्र.१४ मध्ये दिसुन येत आहेत. त्यामुळे तहसिलदार यांनी खालील प्रमाणे प्रमाणपत्र अहवालासोबत सादर करावे.

## प्रमाणपत्र

प्रमाणित करणेत येते की, अहवाल क्र. १४ मध्ये दर्शविण्यात आलेल्या तफावतीमधील नमूद अधिकार अभिलेख (७/१२) हे संगणकीकरणानंतर नव्याने उघडण्यात आलेले असल्याने अशा ७/११२ वर ते उघडलेल्या दिनांकापुर्वीची पिक पाहणी नमूद करण्याचा प्रश्न उदभवत नाही. त्यामुळे वर नमुद कारणास्तव उदभवणा-या तफावतीसह अहवाल स्विकारण्यात यावा.

**स्थळ :-**

**दिनांक :-**

**सही**

**तहसिलदार**

६. तरी वरील सुचनांची अंमलबजावणी करुन यापुढे सी डी पाठविणेत याव्यात आणि या परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी तात्काळ करावी.

(चंद्रकांत दळवी)
**जमाबंदी आयुक्त आणि संचालक**
**भूमि अभिलेख (म.राज्य.) पुणे**

प्रत : मा.प्रधान सचिव (महसुल) महसुल व वन विभाग, मंत्रालय मुंबई, यांना माहितीसाठी.

प्रत : विभागीय आयुक्त (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत :- राज्य सुचना विज्ञान अधिकारी,मुंबई यांना माहीतीसाठी

प्रत : जिल्हाधिकारी (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : उप महानिदेशक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांना माहिती व कार्यवाहीसाठी .

प्रत: डिस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत: जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी (सर्व ) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत : तहसिलदार (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.